01-07-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/30/2025 10:16 PM Page 1



# दुसऱ्या कसोटीत पाच खेळाडूंवर लक्ष केंद्रित

**बर्मिंगहॅम, दि. ३० :**

लीड्समध्ये झालेल्या पहिल्या कसोटीत पराभव पत्करल्यानंतर भारतीय संघ दुसऱ्या कसोटीसाठी सज्ज झाला आहे. बुधवारी एजबॅस्टनच्या मैदानावर इंग्लंडविरुद्ध निर्णायक लढत होणार असून, मालिकेत बरोबरी साधण्यासाठी भारताला दमदार पुनरागमन करणे आवश्यक आहे. या लढतीत दोन्ही संघांसाठी महत्त्वाचे ठरणाऱ्या पाच खेळाडूंवर साऱ्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे.



**१. यशस्वी जयस्वाल – नव्या चेंडूला सामोरे जाण्याचे कसब**

मुंबईचा युवा सलामीवीर यशस्वी जयस्वाल वेस्ट इंडिज दौऱ्यापासून सातत्याने भारतीय फलंदाजीचा कणा बनला आहे. नव्या चेंडूवर सुरुवात देणे आणि इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांचा आत्मविश्वास ढासळवणे, ही मोठी जबाबदारी पुन्हा त्याच्या खांद्यावर आहे. लीड्सपेक्षा भिन्न परिस्थितीत एजबॅस्टनमध्ये त्याची कामगिरी निर्णायक ठरू शकते.

**२. ऋषभ पंत – आक्रमक शैलीतील अस्थिरता, इंग्लंडसाठी धोक्याची घंटा**

टी–२० क्रिकेटपेक्षा कसोटी हा पंतचा अधिक ताकदीचा फॉमट ठरतो. इंग्लंड दौर्यावर तिसऱ्यांदा खेळताना उपकर्णधार असलेला पंत संघातील प्रमुख फलंदाजांमध्ये गणला जातो. त्याच्या डावांची अनिश्चित पण धाडसी रचना इंग्लंडच्या गोलंदाजीला गोंधळात टाकू शकते. लीड्समध्ये भारतीय डावखुऱ्या फलंदाजांनी केलेली शतकी कामगिरी याचे प्रत्यंतर ठरली आहे.

**३. मोहम्मद सिराज – आघाडीचा मारा सांभाळण्याची वेळ**

जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीची शक्यता व्यक्त होत असताना, मोहम्मद सिराजवर आघाडीची जबाबदारी येणार आहे. पहिल्या कसोटीत त्याचा प्रभाव मर्यादित होता, परंतु लय मिळाल्यास सिराज सामना बदलू शकतो. एजबॅस्टनच्या खेळपट्टीवर त्याने अचूक दिशा आणि धारदार मारा दाखवणं गरजेचं ठरेल.

**४. जो रूट – एजबॅस्टनचा राजा**

इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट हा एजबॅस्टनमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे – ९२० धावा, सरासरी ७०.७१. पहिल्या कसोटीत तो काहीसा गडबडीत दिसला, पण तरीही डकेटच्या शतकाला पाठिंबा देत अर्धशतक झळकावलं. बुमराहचा अडसर नसल्यास रूटसारख्या फलंदाजाला रोखण्यासाठी भारताला सुस्पष्ट रणनीती आखावी लागेल.

**५. जोफ्रा आर्चर – शांत घातकता**

दीर्घ विश्रांतीनंतर कसोटी क्रिकेटमध्ये परतलेला जोफ्रा आर्चर हा अजूनही इंग्लंडच्या माऱ्याचा धारदार हत्यार आहे. रेड–बॉल क्रिकेटमध्ये त्याची पुनर्रचना सुरू आहे, पण सुसंगत गती आणि लांब स्पेल खेळण्याची क्षमता टिकवणं ही कळीची बाब ठरेल. खेळपट्टीवर फारशी साथ नसतानाही परिणाम साधणाऱ्या शैलीमुळे तो भारतासाठी मोठा धोका ठरू शकतो.

मालिकेत पिछाडीवर असलेल्या भारतासाठी एजबॅस्टनची दुसरी कसोटी निर्णायक ठरणार आहे. यशासाठी पाचही खेळाडूंनी त्यांच्या भूमिकांमध्ये उत्कृष्टता गाठणं अत्यावश्यक आहे. सामना केवळ बॅट आणि बॉलचाच नसेल, तर नियोजन, मनोबल आणि संयम यांचीही परीक्षा असेल.

# टीम इंडियाच्या गोलंदाजीवर ग्रेग चॅपेल यांची टीका

**बर्मिंगहॅम, दि. ३० :**



भारताने लीड्स येथील पहिल्या कसोटीत इंग्लंडकडून पराभव पत्करल्यानंतर, ऑस्ट्रेलियाचे माजी फलंदाज आणि भारताचे माजी प्रशिक्षक ग्रेग चॅपेल यांनी भारतीय संघाच्या गोलंदाजी आक्रमणातील एकसुरीपणावर तीव्र टीका केली आहे. त्यांनी आगामी दुसऱ्या कसोटीसाठी अर्शदीप सिंग आणि कुलदीप यादव यांना संधी देण्याची शिफारस केली आहे.

ईएसपीएन साठी लिहिलेल्या स्तंभात चॅपेल यांनी स्पष्ट केले की, भारताचा पराभव क्षेत्ररक्षणातील चुकांमुळे झाला असला तरी त्यापेक्षा अधिक गंभीर समस्या गोलंदाजीतल्या एकरूपतेमुळे उद्भवल्या. भारताच्या बहुतेक समस्या त्यांच्याच चुका आहेत. सर्वात महत्त्वाची आणि महागडी चूक म्हणजे नो–बॉल, ज्यामुळे हॅरी ब्रूकला दुसऱ्या डावात जीवदान मिळाले, असे त्यांनी नमूद केले.

चॅपेल यांच्या मते, जसप्रीत बुमराह वगळता भारताचे वेगवान गोलंदाज खूपच समान प्रकारचे आहेत .उजव्या हाताने गोलंदाजी करणारे, मध्यमगती, आणि एका विशिष्ट कोनात मर्यादित राहणारे. गोलंदाजी बदलांमुळे फलंदाजांना पुन्हा समायोजन करावे लागते. सध्या भारताकडे अशी कोणतीही परिवर्तनशीलता नाही, असे ते म्हणाले.

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, बुमराहशिवाय अर्शदीप सिंग सारख्या डावखुऱ्या गोलंदाजाची संघात आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, कुलदीप यादव हा मनगटी फिरकी गोलंदाज देखील आक्रमणात समाविष्ट व्हायला हवा, ज्याने विविधता आणि गती यामध्ये बदल साधता येईल.

बुमराहच्या अनुपस्थितीची शक्यता लक्षात घेता, चॅपेल यांनी भारताच्या गोलंदाजीतील अचूकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सतत दोन चेंडू धोकादायक ठिकाणी टाकताना दिसले नाहीत. चेंडू अनेकदा अत्यंत पुढचा, खूप मागचा किंवा वाइड होता. बुमराहवर संपूर्ण आक्रमणाचा भार आहे, आणि इंग्लंडला हे ठाऊक आहे, असे त्यांनी म्हटले. चॅपेल यांनी भारतीय संघ व्यवस्थापनाच्या फलंदाजीस प्राधान्य देणाऱ्या धोरणावरही टीका केली. फलंदाजी खोल करण्यासाठी अतिरिक्त फलंदाज घेण्यापेक्षा, २० बळी घेण्यासाठी संतुलित गोलंदाजी आक्रमण आवश्यक आहे. धावा करण्याची जबाबदारी टॉप सहा फलंदाजांवरच असली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे म्हटले.

# यूएस ओपन बॅडमिंटन: तन्वी शर्माचा पराभव

**अमेरिका, दि. ३० :**



भारताची युवा बॅडमिंटनपटू तन्वी शर्माला यूएस ओपन सुपर ३०० स्पर्धेच्या अंतिम फेरीत अमेरिकेच्या अनुभवी बेईवेन झांगकडून पराभव पत्करावा लागला. ती ११–२१, २१–१६, २१–१० अशा सरळ गेममध्ये झांगच्या अनुभवापुढे हार मानली, परंतु या स्पर्धेतील तिचा खेळ भारतीय बॅडमिंटनसाठी आशादायक मानला जात आहे.

सायना नेहवालने १६व्या वर्षी फिलिपिन्स ओपन जिंकले आणि पी. व्ही. सिंधूने १७व्या वर्षी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्य पदक पटकावले होते. त्याच पावलावर पाऊल टाकत, तन्वीनेही आपल्या पहिल्याच मोठ्या टूर फायनलमध्ये पोहोचून स्वतःच्या गुणवत्तेची झलक दाखवली. मात्र अंतिम फेरीतील अनुभवाच्या अभावामुळे तिला झांगच्या समोर अडथळा पार करता आला नाही.

३४ वर्षीय बेईवेन झांगसारख्या अनुभवी खेळाडूविरुद्ध तन्वीला पहिल्या आणि तिसऱ्या गेममध्ये बचावात्मक ठेव धरणे कठीण गेले. दुसऱ्या गेममध्ये मात्र तिने उत्कृष्ट पुनरागमन करत २१–१६ अशी आघाडी घेतली आणि आपली ताकद दाखवून दिली. तिच्या आक्रमक क्रॉस–कोर्ट फटक्यांमुळे झांग काहीशी गोंधळात आली होती . पण निर्णायक तिसऱ्या गेममध्ये झांगच्या वेगवान फटक्यांनी आणि स्थिती–आधारित आक्रमणाने तन्वीचा बचाव भेदला.

तन्वीचे खेळात तांत्रिक कौशल्य स्पष्ट होते. तिचे ड्रॉप शॉट्स, फ्लँक अटॅक आणि स्मॅशेस चांगले होते. मात्र नेटजवळ तिचा कमिटमेंटचा अभाव आणि मिड–कोर्टवरून नियंत्रण गमावणे यामुळे ती निर्णायक क्षणी अडचणीत आली.

झांगने तन्वीला मागे ढकलण्याचे धोरण राबवत तिच्या बचावातील त्रुटी शोधल्या. सतत स्थितीबाहेर खेळावे लागत असल्याने तन्वीने अनेक चुका केल्या. तिच्या खेळाचा वेग आणि बचाव अजून प्रगल्भ होणे गरजेचे आहे, हे या सामन्याने अधोरेखित केले.

एकूणच, ती फक्त १६ वर्षांची असली तरी अशा स्तरावरील अंतिम फेरीत तिच्या क्षमतेचे दर्शन घडले. मात्र, या पराभवातून ती काय शिकते आणि पुढच्या स्पर्धांमध्ये ही गती कशी टिकवते, यावर तिच्या कारकिर्दीचा पुढचा टप्पा ठरणार आहे.

सध्या भारतीय महिला एकेरी खेळात सिंधूच्या फॉर्ममधील चढउतारामुळे निराशा पसरली आहे. अशा परिस्थितीत तन्वी शर्मासारख्या नवोदित खेळाडूची झलक भारतीय बॅडमिंटनसाठी नवा श्वास ठरू शकते. सायना आणि सिंधूने टॉप १०मध्ये पोहोचण्यासाठी अनेक पराभवांमधून वाट काढली होती. त्यामुळे अंतिम फेरी गाठणे हे फक्त टप्पे आहेत अंतिम ध्येय नव्हे. तन्वी शर्माला याच भुकेने खेळावे लागेल. कारण, सर्वोच्च पातळीवर सातत्य ठेवण्यासाठी केवळ कौशल्य नव्हे तर जिद्द आणि धडपडही तितकीच महत्त्वाची असते.

# फिफा क्लब वर्ल्ड कपवर फ्रान्सच्या खेळाडू संघटनेची तीव्र टीका

**पॅरिस, दि. ३० :**



फ्रान्समधील व्यावसायिक फुटबॉलपटूंच्या संघटनेने (यूएनएफपी ) फिफाच्या आगामी क्लब वर्ल्ड कपवर कडाडून टीका केली असून, ही स्पर्धा खेळाडूंवरील नरसंहार असल्याची तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. आधीच ताणलेल्या वेळापत्रकामुळे थकलेल्या खेळाडूंना विश्रांती न देता पुन्हा स्पर्धेत झोकून देणे, हे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करणारे पाऊल असल्याचे यूएनएफपी चे मत आहे.

यूएनएफपीने फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांच्यावरही टीकेची झोड उठवली असून, त्यांनी खेळाडूंच्या चिंतेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की , ही परिस्थिती किती विसंगत आहे हे सर्वांनाच जाणवते अर्थातच इन्फँटिनो आणि त्यांच्यासमवेत असलेल्या खुशमस्कऱ्यांशिवाय.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, ३२ टॉप क्लब्सच्या सहभागासह होणारी ही नवीन स्पर्धा ही खेळाडूंविषयीच्या काळजीपेक्षा फक्त व्यावसायिक फायदे आणि पैशांच्या हव्यासावर आधारित आहे.

फिफा क्लब वर्ल्ड कप २०२५ मध्ये अमेरिकेत जून महिन्यात होणार असून, तो युरोपियन क्लब सीझन संपल्यानंतर लगेच पार पडणार आहे. परिणामी, खेळाडूंना व्यावसायिक विश्रांतीचा किमान तीन आठवड्यांचा हक्क गमवावा लागतो.

उदाहरणार्थ, पीएसजी चे स्टार्स उस्मान डेम्बेले आणि डिझायर ड्यू हे चॅम्पियन्स लीग संपल्यानंतर थेट राष्ट्रीय संघात खेळले आणि त्यानंतर लगेच क्लब वर्ल्ड कपमध्ये उतरले. हे न थांबणारे चक्र आता बर्नआउट आणि दुखापतींना आमंत्रण ठरू लागले आहे.

यूएनएफपी ने नमूद केले की, या स्पर्धेचा परिणाम केवळ क्लबवर नव्हे, तर राष्ट्रीय संघांवरही होतो. फ्रान्सचे प्रशिक्षक डिडिएर डेसचॅम्प्स हे सप्टेंबरमध्ये होणाऱ्या २०२६ विश्वचषक पात्रता फेरीनिमित्त तयारी करत आहेत. पण खेळाडूंना वेळेवर उपलब्ध न मिळाल्यास त्यांच्या योजनांवर परिणाम होणार आहे.

यूएनएफपी ने फिफाला स्पष्ट शब्दांत आवाहन केले आहे की, हा खेळाडूंवरील नरसंहार त्वरित थांबवावा. त्यांनी फिफा कडून खेळाडूंना आवश्यक विश्रांती, पुनर्बलन आणि वैद्यकीय संरक्षण याचा आदर करण्याची मागणी केली आहे.

फिफा चा क्लब वर्ल्ड कप ही केवळ एक स्पर्धा नाही, तर तो खेळाच्या सध्याच्या आणि भविष्यकालीन आराखड्यांवर खोल परिणाम करणारा विषय ठरला आहे. खेळाडूंच्या हक्कांसाठी कायदेशीर कारवाई व संपाचा इशारा आधीच हवेत आहे.

# एफआयएच प्रो लीगमध्ये भारताचा चीनकडून पराभव

**बेल्जियम, दि. ३० :**



एफआयएच महिला प्रो लीगमधून आधीच बाहेर पडलेल्या भारतीय संघाला अखेरच्या सामन्यातही पराभव पत्करावा लागला. पॅरिस ऑलिंपिकच्या रौप्यपदक विजेत्या चीनकडून २–३ अशी हार स्वीकारावी लागल्यानंतर भारताने स्पर्धा तळाच्या स्थानावर पूर्ण केली आणि आता एफआयएच नेशन्स कपमध्ये स्थान मिळवले आहे.

प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांच्या मार्गदर्शनाखालील भारतीय महिला हॉकी संघाला संपूर्ण युरोपियन लेगमध्ये एकही विजय नोंदवता आला नाही. केवळ १० गुणांसह त्यांनी स्पर्धेत लाकडी चमचा' (शेवटचे स्थान) मिळवले. सामना सुरू होण्याआधीच भारताचे प्रो लीगमधून बाहेर पडणे निश्चित झाले होते, तरीही संघाला विजयासह शेवट करायची संधी होती. परंतु चुरशीच्या खेळात सुरुवात चांगली करूनही ती गमावण्यात आली.

भारताने पहिल्या तिमाहीत आक्रमक सुरुवात करत नवव्या मिनिटाला आघाडी घेतली. फॉरवर्ड सुनीलिता टोप्पोने अचूक चेंडू घेऊन डाव्या बाजूने ड्रीब्लिंग करत कर्णरेषीय फटका झळकावत चीनविरुद्ध १–० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर भारतीय बचावफळीने काही काळ चीनचे आक्रमण रोखले, परंतु दुसऱ्या तिमाहीपासून सामन्याचे चित्र बदलत गेले.

दुसऱ्या तिमाहीत चीनने सलग तीन पेनल्टी कॉर्नर मिळवले आणि त्यातील शेवटच्या प्रयत्नात यिंग झांगने १९व्या मिनिटाला बरोबरी साधली. त्यानंतर २४व्या मिनिटाला भारताला ग्रीन कार्डमुळे संख्यात्मक आघाडी मिळाली, पण भारत त्याचा फायदा घेऊ शकला नाही. त्याउलट, क्वार्टर संपण्यापूर्वी झांगने पुन्हा एकदा पेनल्टी कॉर्नरवर गोल करत चीनला २–१ अशी आघाडी मिळवून दिली.

ड्रेसिंग रूममध्ये प्रशिक्षकांच्या सूचनांनंतर भारतीय संघाने तिसऱ्या तिमाहीत पुनरागमन करत बरोबरी साधली. ३८व्या मिनिटाला नवनीत कौरच्या पासवरून रुतुजा पिसलने गोल केला. दोन्ही संघांनी जोरदार प्रयत्न केले, पण भारताने या तिमाहीत बचावात उल्लेखनीय कामगिरी करत कोणतीही अडचण येऊ दिली नाही.

चौथ्या आणि निर्णायक तिमाहीत चीनने पुन्हा वर्चस्व गाजवले. ५३व्या मिनिटाला वेन्यू झूने पेनल्टी कॉर्नरवरून निर्णायक गोल करत चीनला ३–२ अशी आघाडी मिळवून दिली. शेवटच्या काही मिनिटांत भारताकडे ब्युटी डंग डंग, नवनीत कौर, बलजीत कौर आणि दीपिकामार्फत संधी निर्माण झाली होती, परंतु अंतिम टप्प्यात निर्णायक निर्णय घेण्यात संघ कमी पडला.

पुरुष संघाने आपला शेवटचा सामना जिंकून रेलिगेशनपासून बचाव केला असला, तरी महिला संघाला हे जमले नाही. प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांच्यासमोर आता पेनल्टी कॉर्नर डिफेन्स, शेवटचा फिनिश आणि बॉक्समध्ये गोंधळ या मुद्द्यांवर पुन्हा विचार करण्याची वेळ आली आहे.

भारतीय महिला हॉकी संघासाठी हा हंगाम निराशाजनक ठरला असला तरी, पॅरिस ऑलिंपिकपूर्वीची तयारी आणि चुका सुधारण्याची ही अंतिम संधी ठरू शकते.

# बुमराहच्या मर्यादित सहभागावरून वादंग

**मुंबई, दि. ३० :**



इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत जसप्रीत बुमराहच्या मर्यादित सहभागाच्या घोषणेमुळे भारतीय संघ व्यवस्थापनावर टीका होत आहे. भारतीय क्रिकेट संघाचा माजी फलंदाज आकाश चोप्रा आणि माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी यावर आपली नाराजी व्यक्त केली आहे.

आकाश चोप्रा याने युट्यूब व्हिडिओद्वारे व्यक्त केलेल्या मतात म्हटले आहे की, मालिकेपूर्वी बुमराह फक्त तीन कसोटी सामने खेळेल, अशी माहिती जाहीर करणे आवश्यक होते का, याबाबत शंका उपस्थित होते. बुमराह फक्त तीन सामने खेळेल हे वारंवार सांगितले गेले. पण असे का? संघाची रचना, रणनीती गुप्त ठेवली पाहिजे. आपण आपल्या प्लेइंग इलेव्हनचीही पूर्वसूचना देत नाही. मग हे उघड का करावे? असा सवाल चोप्रा याने उपस्थित केला.

चोप्रा पुढे म्हणाला की , हे माहिती झाल्यावर विरोधक त्यांचं नियोजन करतात. इंग्लंडसारख्या संघाला जर कळले की बुमराह प्रत्येक सामन्यात खेळणार नाही, तर त्यानुसार खेळपट्ट्याही तयार होऊ शकतात. आपल्या सर्वोत्तम वेगवान गोलंदाजाचा पूर्ण वेळ सहभाग नसेल, ही माहिती सामरिकदृष्ट्या कमकुवत करणारी ठरू शकते.

लीड्समध्ये झालेल्या पहिल्या कसोटीत भारताचा ५ गडी राखून पराभव झाला. इंग्लंडने ३७१ धावांचे लक्ष्य गाठत कसोटी क्रिकेटमधील त्यांच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा धावपाठलाग केला. बुमराहने पहिल्या डावात ५/८३ अशी शानदार कामगिरी करत भारताच्या आघाडीच्या माऱ्याचे नेतृत्व केले होते. मात्र दुसऱ्या डावात त्याला एकही बळी मिळवता आला नाही.

या पराभवानंतर भारताने बुमराहला दुसऱ्या कसोटीत विश्रांती देण्याचा विचार केला आहे. मात्र त्यावरही माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी स्काय स्पोर्ट्सवरील चर्चेत सांगितले की, जर तुम्ही बुमराहला विश्रांती देण्याचा विचार करत असाल, तर दोनदा विचार करा. तो सध्या तुमचा सर्वोत्तम गोलंदाज आहे. जर तो दुसऱ्या सामन्यात नसला आणि तुम्ही २–० ने पिछाडीवर गेला, तर मालिका वाचवणे कठीण होईल.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समिती प्रमुख अजित आगरकर यांनी मालिकेपूर्वी स्पष्ट केले होते की बुमराह केवळ तीन किंवा गरज भासल्यास चार सामने खेळेल. पण चोप्रा आणि शास्त्री यांचे मत आहे की अशा संवेदनशील माहितीचे सार्वजनिक प्रकटीकरण टाळणे अधिक योग्य ठरले असते.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २९९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 299 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .